सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मातोश्रीच्या थकीत ऊस देयकासाठी शेतकऱ्यांचा काँग्रेसभवन समोर ठिय्या

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर -**

काँग्रेसचे माजी गृराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मातोश्री साखर कारखान्यात गाळपासाठी दिलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या प्रलंबित देयकासाठी पुन्हा एकदा सोलापूर शहरातील काँग्रेस भवन समोर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान बुधवार ( दी. ४ ) सप्टेंबर हा काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांचा वाढदिवस असून नेमक्या दिवशी शेतकऱ्यांनी काँग्रेस भवनाच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी लाजीरवाणी गोष्ट ठरली आहे. मातोश्री कारखान्यात गाळपासाठी ऊस घातलेल्या शेतकऱ्यांना सिद्धाराम म्हेत्रे यांनी टनाला २७०० भाव जाहीर केला आहे. ठराविक शेतकऱ्यांना पाचशे रू आणि काहींना सातशे रू याप्रमाणे बँकेच्या खात्यात रक्कम जमा केले आहेत. मात्र मागील आठ महिन्यांपासून एक रुपयाही खात्यामध्ये जमा केलेला नाही, तेच थकीत देयके मिळण्यासाठी शेतकरी आता आक्रमक भुमिकेत आला आहे. मागील काही दिवसांपूर्वी म्हेत्रे यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन केले. त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी टाइमिंग साधत शेवटी काँग्रेस भवन गाठले आहे.

**ऊसाचे थकीत देयक घेतल्याशिवाय जाणार नाही.**

थकलेल्या दीड लाखांच्या ऊस बिलासाठी मी काँग्रेस भवन समोर बसलो आहे. माझ्या सोबत अनेक शेतकरी विविध तालुक्यातून आणि गावातून आलेले आहेत. मागील काही दिवसांपूर्वी म्हेत्रे यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन केले होते. त्यावेळी केवळ आश्वासन मिळाले. आता रक्कम घेतल्या शिवाय जाणार नाही.

**- भीमा आगलावे, ऊस उत्पादक शेतकरी.**



### नवीन पिढीसमोर शिक्षक हा सामाजिक आदर्श : डॉ.श्रीकांत पाटणकर

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास म्हणजेच पाठ्यपुस्तकाद्वारे पाठांतर करून केवळ परीक्षेतील भरघोस मार्क नसून सामाजिक भान,वैचारिक विकास व संस्कार महत्त्वाचे आहे. त्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांची निरीक्षण शक्ती कोणत्याही प्रश्नाकडे डोळसपणे पाहण्याची व्यक्ती निर्माण करण्याचे काम शिक्षकच करू शकतो. वैयक्तिक लक्ष देऊन नवीन पिढीसमोर अभ्यासू शिक्षक हा सामाजिक आदर्श करू शकतो असे प्रतिपादन मानसोपचार तज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर यांनी केले. सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया व कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर येथे आयोजित गुणवंत शिक्षक पुरस्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहा गुणवंत शिक्षकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे होते. सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील सचिवा सपना चिट्टे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. विजया महाजन, डॉ. नभा काकडे होते. यावेळी डॉ. श्रीकांत पाटणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह,शाल आणि श्रीफळ देऊन प्रा. डॉ. नीलिमा - दामले बीबीएफ दयानंद कॉलेज, प्रा.डॉ.दीपक देडे - संतोष भीमराव पाटील कॉलेज मंद्रूप, प्रा. राम ढाले - प्राचार्य एस व्ही सी एस हायस्कूल जूनियर कॉलेज, भवानी पेठ, इस्माईल शेख - प्राचार्य अहिल्या देवी प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, संगीता शिर्के आदर्श बालक मंदिर, विद्या- हराळे लांबतुरे यमाई देवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी यांचा गौरव करण्यात आला. डॉ. एन. बी. तेली यांनी स्वागत केले तर प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पद्माकर कुलकर्णी यांनी केला तर सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले.

## निधन वृत्त...

### चंदप्पा माड्याळ



**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

नागणसूर येथील चंदप्पा संगप्पा माड्याळ (वय ८८) यांचे मंगळवारी (दि.३) दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सूना व नातवंडे असा परिवार आहे. ते भारतीय जवान लिंगन्ना चं. माड्याळ यांचे वडील होते. त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या शेतात बुधवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विजया हिवरेकर



**पंढरपूर, दि.४ सप्टेंबर-**

येथील विजया नरहर हिवरेकर वय वर्षे ८६ यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वे.शा.सं. राजन हिवरेकर यांच्या त्यां मातोश्री होत.

**नावात बदल**

माझे जुने नांव : **सरिता राजेंद्र गुदलानी** असे होते, ते बदलून माझे नवीन नांव : **संगिता राजेंद्र गुदलानी** असे केले आहे. तरी मला आजपासून नविन नांवाने ओळखावे.
पत्ता: 38, गूरुनानक नगर, सोलापूर - 413 003.

**नावात बदल**

माझे जुने नाव **परमजितकौर** असे असून माझे चालू नाव **परमजितकौर जासपालसिंग पोथिवाल** असे आहे. दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.
पत्ता : एल २०१/१२६ म्हाडा कॉलनी, सोलापूर
**ऑफि नं. २५०३**
**दि. ०४/०९/२०२४**

# आता आळस झटकून एकदिलाने कामाला लागायचे!

**पालकमंत्री पाटील यांच्या कार्यकर्ता मेळाव्यात सक्त सूचना**

**भाजपाकडून विधानसभेची मायक्रोप्लॅनिंग सुरू**

**तगड्या पोलिस बंदोबस्तात दिवसभर बैठकांचा धडाका**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

राज्यात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला १७ जागा मिळाल्या. तरीही १३० विधानसभा मतदारसंघात भाजपने आघाडी घेतली होती. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी निर्माण केलेला नेरेटिव्ह खोडून काढण्यात महायुतीला यश आले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपा कार्यकर्त्यांनी आळस झटकून एकदिलाने आता कामाला लागावे, अशा सक्त सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोलापुरात कार्यकर्त्यांच्या बैठकीत आज (दि. ४) बोलताना दिल्या. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात आलेल्या अपयशाचे आत्मचिंतन करीत भाजपाने आगामी विधानसभेसाठी मायक्रोप्लॅनिंग करून तयारी सुरू केल्याचे चित्र आज दिसून आले.

जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय आयोजित केलेल्या या बैठकांसाठी आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ.समाधान आवताडे, आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, आ. राजेंद्र राऊत, विक्रम देशमुख , शहराध्यक्ष नरेंद्र काळे, शशिकांत चव्हाण, आप्पासाहेब बिराजदार, राजकुमार पाटील, विकास वाघमारे यासह सोलापूर शहर-जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील उमेदवारांच्या झालेल्या पराभवाने भाजपचे अनेक कार्यकर्ते नाराज आहेत. मात्र येणारी विधानसभा निवडणूक महत्त्वाची आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत झालेला पराजय विसरून आगामी विजयासाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे, असे यावेळी बोलताना पालकमंत्री पाटील म्हणाले. जिल्ह्याचे पालकमंत्री पाटील यांनी बुधवारी संपूर्ण दिवसभर सात रस्ता येथील शासकीय विश्रामगृहावर तालुकानिहाय कार्यकर्ता बैठकांचा धडाका लावला होता. सकाळी साडेदहापासून या बैठकांना सुरुवात झाली आणि सायंकाळपर्यंत या बैठका सुरूच होत्या. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शासकीय विश्रामगृहावर सर्व बाजुंनी पोलिसांचा तगडा बंदोबस्त पाहायला मिळाला. मुख्य प्रवेशद्वारावर पोलीस कर्मचारी प्रत्येकाला अडवून व विचारून आत मध्ये पाठवले जात होते. आत मध्ये आल्यावर सुद्धा पुष्कराज या शासकीय विश्रामगृहातील इमारतीला लोखंडी बॅरिगेटने घेराव घालण्यात आला होता आणि सर्वत्र पोलीस उभे करण्यात आले होते.



पालकमंत्री पाटील यांनी आत मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या काही ठराविक पदाधिकाऱ्यांना बोलावून बैठका घेत आगामी विधानसभेबाबत मार्गदर्शन केले आहे. तालुका निहाय प्रत्येकांना वेळ देण्यात आला होता. त्याप्रमाणे कार्यकर्ते पालकमंत्र्यांच्या बैठकीला आपापल्या वेळेत आत जात असल्याचे दिसून आले. यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या बैठका लावण्यात आल्या होत्या आणि सर्वच तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या अडचणी, विकास निधी यासंदर्भात पालकमंत्री पाटील यांनी सविस्तर चर्चा केल्याचीही माहिती काही कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना दिली.

# दक्षिण सोलापूर तालुक्यातील पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत

**प्रति एकरी २५ हजार अग्रीम मदत द्यावी**

**ॲड. वैद्य यांची थेट मुख्यमंत्र्यांकडे मागणी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर -**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील पावसामुळे झालेल्या खरीप पीकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. प्रति एकरी २५ हजार अग्रीम मदत देण्यात यावी, अशी मागणी स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक सोमनाथ वैद्य यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्याच्या विकासाचा ध्यास घेतलेले ॲड. सोमनाथ वैद्य यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज घेऊन तातडीने थेट मुख्यमंत्र्यांना भेटून ही मागणी केली आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातील दि. १ व २ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या संततधार पावसामुळे खरीप पीकांचे मोठे नुकसान झालेले आहे. येत्या काही दिवसात काढणीला येणा-या पीकांचे नुकसान झालेले आहे. गेल्या दोन महिन्यापुर्वी या भागातील शेतकऱ्यांनी ३० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरण्या केल्या होत्या. त्यासाठी प्रति एकरी २० ते २५ हजार रुपये खर्च करण्यात आला होता. या भागातील शेतकरी अत्यंत गरीब असून शेतीवरच त्यांचा उदरनिर्वाह सुरु आहे. गेल्या २ दिवसात झालेल्या संततधार पावसामुळे काढणीला आलेल्या उडीद, तुर, मका, लिंबू, कांदा तत्सम पिकाच्या उत्पादनांमध्ये ८० टक्के पेक्षा घट होणार आहे. त्यामुळे येथील शेतकरी व त्यावर आधारीत सर्व रोजगारी लोकांचे आर्थिक गणित बिघडणार आहे.

ॲड. सोमनाथ वैद्य यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**पीक नुकसान पंचनाम्याबाबत मदत व पुनर्वसन कार्यालयास केले सुचित**

ॲड. सोमनाथ वैद्य यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेला अर्ज पीक नुकसान पंचनामे बाबत पुढील कार्यवाहीसाठी मदत व पुनर्वसन (महसूल व वन विभाग) यांना पाठविण्यात आला आहे. यामुळे लवकरच कार्यवाही होणार आहे.

# जि.प.च्या २५ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**आज पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण**

**जिल्हा शिक्षण अधिकारी कादर शेख यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्राप्त प्रस्तावांमधून समितीमार्फत मूल्यांकन करुन, प्रत्येक तालुक्यातून एक शिक्षकाची निवड असे एकूण २५ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. हे पुरस्कार पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची अशी माहिती जिल्हा शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

जिल्हा शिक्षण अधिकारी शेख म्हणाले, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श पुरस्कार देवून गौरवण्यात येणार आहे. जिल्ह्यातून २०२४ -२०२५ च्या पुरस्कारासाठी प्रस्ताव मागण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांमधून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. सदरच्या पुरस्काराचे वितरण हुतात्मा स्मृती मंदीर, पार्क चौक या ठिकाणी आज ५ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. जिल्हा शिक्षण अधिकारी शेख यांनी सांगितले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील दत्तात्रय पोतदार यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, बार्शी तालुका गोरोबा यावलकर, करमाळा तालुका अनिल यादव, माढा विजया पवार, माळशिरस आत्माराम गायकवाड, मंगळवेढा उध्दव इंगळे, मोहोळ हणमंत बनसोडे, पंढरपूर रविकिरण वेळापूर, सांगोला बापूसो भंडगे, उत्तर सोलापूर शिवाजी वडते, दक्षिण सोलापूर चंद्रकांत सुरवसे, माढा किरण शेलार, मंगळवेढा सिध्दप्पा कोळी, अक्कलकोट सोमलिंग पट्टणशेट्टी, बार्शी आनम्द घाडगे, करमाळा सुवर्णा जाधव, माढा उर्मिला टिळेकर, माळशिरस प्रदिप भोसले, मंगळवेढा नितीन साठे, मोहोळ अनिल पांढरे, पंढरपूर नितीन पवार, सांगोला शितल चव्हाण, उत्तर सोलापूर शांतप्पा हेगोंडे, दक्षिण सोलापूर जिन्नेदबाशा नदाफ, सोलापूर विस्तार अधिकारी (शिक्षण) रतिलाल भुसे यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याचे जिल्हा शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com
जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि/७२५/२०२४ दि.०४/०९/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. लक्ष्मण मल्लप्पा भरमशेट्टी - अर्जदार**
रा. हन्नूर ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय - सामनेवाला**
**ग्रामपंचायत, हन्नूर ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील श्री. लक्ष्मण मल्लप्पा भरमशेट्टी यांनी त्याचे आजी कै. नागाबाई लक्ष्मण भरमशेट्टी यांचा मृत्यू दि. १३/०३/१९८३ रोजी मौजे हन्नूर ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतू त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे श्री. लक्ष्मण मल्लप्पा भरमशेट्टी यांनी त्याच्या आजीच्या मृत्यूची नोंद करुन घेवून मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.३१/०५/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आजीच्या यांचे नावे नागाबाई लक्ष्मण भरमशेट्टी यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०४/०९/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**तहसिलदार, अक्कलकोट**

# सोलापूर जिल्हा परिषदेचे 'इको' पाऊल

**प्लास्टिकचा वापर करुन बनविणार पक्के रस्ते**

**कचऱ्याची योग्य विल्हेवाट, रस्त्याच्या खर्चात होणार बचत**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीणची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदेने प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी प्रबोधन करणे सुरू केले आहे डांबरी, सिमेंट काँक्रिट, अल्ट्रा थीन व्हाइट टॅपिंग, खाली काँक्रिटचा थर आणि वर डांबरी रस्ता असे अशा 'टिकाऊ' रस्त्यांची परंपरा सोलापूर जिल्ह्यात सुरु होणार आहे. आता नव्या प्रयोगाची भर पडणार आहे. अविघटनशील प्लास्टिक कचऱ्याचा वापर रस्त्याच्या उभारणीसाठी केला जाणार आहे. सोलापूर जिल्हा परिषदेने प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी प्रबोधन करणे सुरू केले आहे. जिल्हा परिषदेचे बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागास लेखी पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी संबधित विभागांना सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, गेल्या काही वर्षांत प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. प्लास्टिकचे कचऱ्याचे विघटन होत नाही. त्यामुळे नदी-नाले तुंबतात, शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होते. त्यावर मात करण्यासाठी प्लास्टिक वापरावर बंदी आणण्याचे प्रयत्नही फारसे यशस्वी होताना दिसत नाही. परंतु, प्लास्टिकचा वापर विधायक पद्धतीने करण्यासाठी जगभरात विविध प्रयोग केले जात असून रस्त्यांच्या उभारणीत प्लास्टिकचा वापर करणे हा त्याच प्रयत्नांचा एक भाग आहे. अविघटनशील प्लास्टिक कचऱ्याच्या विघटन करून त्याचा वापर रस्त्याच्या डांबरीकरणाच्या अस्तरीकरणामध्ये करून सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागतील रस्त्यांचा विकास करण्याचा निर्णय येणार आहे. असल्याचे जिल्हा परिषदेचे घेतला आहे.सीईओ कुलदीप जंगम यांनी पदभार घेतल्यापासून नवनवीन उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. पदभार घेतल्यापासून प्रत्यक्ष भेटीवर चांगलाच जोर दिला असून प्रशासन चांगलेच कामाला लागले आहे.



भारतीय सडक कांग्रेस (आईआरसी) च्या ग्रामीण स्तरावरील रस्त्यात डांबराचे कारपेट पध्दतीने प्लास्टिक चा वापर यापुढे बंधनकारक असणार आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार, ग्रामीण ग्रामपंचायत स्तरावरील प्लास्टिक प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम हाती घेण्यात येणार आहेत. गटविकास अधिकारी यांना प्रत्येक गावात भेटी देऊन आढावा देण्याबाबत कळविले आहे. जिल्हातील ग्रामीण भागातील रस्त्यामध्ये डांबर आणि प्लास्टिक चा वापर करुन 'इको' रस्ते बनविण्याचा मानस आहे.

**- कुलदीप जंगम, सीईओ, जिल्हा परिषद, सोलापूर**



आईआरसी च्या माध्यमातून या उपक्रमातून ग्रामीण भागातील रस्ते आता 'इको' होणार आहेत. आता ग्रामीण भागातील रस्ते बनविताना रस्त्यामध्ये वाळू वापरण्या ऐवजी प्लास्टिकचे तुकडे आणि डांबर मिक्स वरुन ग्रामीण भागात कारपेटचे रस्ते बनविण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे ग्रामीण भागातील रस्ते हे २०० ते ५०० मीटरचे रस्ते असतात त्यासाठी या उपक्रमाचा चांगलाच उपयोग तालुक्याला होणार आहे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्याने रस्ते जास्त टिकाऊ, मजबुत व टिकाऊ होणार आहे.

**- संतोष कुलकर्णी, जि.प. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग-२**

**Yashoda Shikshan Prasarak Mandal's**
**Sojar College of Pharmacy, Khandvi**
Tal: Barshi, Dist: Solapur.
(MS) 413401 Ph: 02184-297000
**ADMISSION NOTICE: 2024-25**
Application are invited from the eligible candidates for
DIRECT SECOND YEAR B. PHARMACY
Admission for the academic year 2024-25 for probable Vacancies after CAP rounds.
Detail schedule of admission process is displayed on college notice board & college website.
**CONTACT**
**Sojar College of Pharmacy, Khandvi, Barshi**
**PH: (02184) 297000, Mo. 9604397996 / 9420702085 / 9923332316**
**E-mail: sojarcop@gmail.com**
**Web Site: www.sojarcop.edu.in**
**PRINCIPAL PRESIDENT**

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, सोलापूर**
**पत्ता :- गुरुनानक चौक, उजनीनगर, सोलापूर**
**ई निवीदा सुचना क्र. 07 सन 2024-25**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १ | रुपांतरीत साठवण तलाव केम, ता. करमाळा, जि. सोलापूर चे बांधकाम करणे. | २०८.७४ |
| २ | रुपांतरीत साठवण तलाव केम (के.एल.) ता. करमाळा, जि. सोलापूरचे बांधकाम करणे. | १८५.६८ |
| ३ | रुपांतरीत साठवण तलाव केम (कासारवाडी) ता. करमाळा, जि. सोलापूरचे बांधकाम करणे. | २१०.३७ |
| ४ | रुपांतरीत साठवण तलाव सालसे, ता. करमाळा, जि. सोलापूरचे बांधकाम करणे. | ३५३.७९ |

ई-निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक : ०४/०९/२०२४ ते ११/०९/२०२४
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : १३/०९/२०२४

**जा.क्र./निविदा/३२७७/२०२४-२५**
**दिनांक : ०३/०९/२०२४**

**सही/-**
**जिल्हा जलसंधारण अधिकरी,**
**मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर**